महाराष्ट्र विधानसभा

विधानसभा
सत्यमेव जयते
महाराष्ट्र

अनिल गोटे
माजी आमदार
घर नं. 1321, ग.नं. 4, धुळे 424001
+91 98501 09100, +91 8888330066
+91 9421883366
goteanil@gmail.com

पत्रक क्र. ७५
धुळे दि. १८/०६/२०२५

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्या आरोपींच्या अर्जावर तपासी एजन्सी बदलण्याची आदेश दिले होते, त्यातील पाच आरोपींना सीआयडीने अंतिम आरोप पत्रात वगळले! मुख्यमंत्र्यांच्या तपासातील बेकायदेशीर हस्तक्षेप कामी आला!
- देवेन भारती यांनी सीआयडी तपास करू शकत नसल्याचे स्पष्टपणे कळवले. त्याच सोबत एसआयटी नेमण्याबद्दल त्यांनीच सांगितले होते. मग पुनश्च त्यांनाच तपास करण्यास सांगण्यामागे मुख्यमंत्र्यांचा स्वच्छ हेतू नाही!
- रावल बँकेच्या ९८ कोटी रुपयांच्या भ्रष्टाचारातून जयकुमार रावल यांची व त्यांच्या कुटुंबियासह आरोप पत्रातून नावे वगळण्याची सीआयडीची शिफारस!
- पण सख्खे काका व कौटुंबिक विरोधक बापूसाहेब उर्फ जयदेवसिंह जयसिंह रावळ इत्यादी ८ आरोपींवर भ्रष्टाचाराच्या गंभीर गुन्ह्याखाली आरोपपत्र! ७ वर्षापासून जन्मठेपेपर्यंत शिक्षेची तरतुद
- जयकुमार रावल यांचे वडील जितेंद्र सिंह (सरकार साहेब), मातोश्री हंसाराणी, माजी मंत्री गावित व ११ आरोपींचे आरोपातून नाव वगळण्याचे सीआयडीच्या उपअधीक्षिका प्रतिभा बिरारींचा फॉरेन्सीक ऑडीटसह अहवाल न्यायालयात दाखल!
- भ्रष्टाचारास सर्व संचालक मंडळ जबाबदार असताना, तुम्ही जयकुमार रावल यांना वगळू कसे शकतात?

**शिवसेना नेते, माजी आमदार,**
**कार्यसम्राट अनिल अण्णा गोटे, यांचा नवा गौफ्यस्फोट!**

राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र गंगाधर फडणवीस यांनी रावल बँकेचे संशयित आरोपी, ज्यांना अटक करण्याकरता, तत्कालीन पोलीस अधीक्षक श्री. साहेबराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली, ५५ पोलीस कर्मचारी, ५ महिला पोलीस कर्मचारी, ८ पोलीस अधिकारी, २ आरसीपी पथक, १ क्यूआरटी पथक व १० वाहनांची व्यवस्था असलेले स्वतंत्र पथक तयार करण्यात आले होते. जयकुमार रावल तेव्हाही मंत्री होते व आजही मंत्री आहेत. त्यांचे वडील जितेंद्र सिंह, काका बापूसाहेब तथा जयदेवसिंह रावल, त्यांच्या मातोश्री सौ. हंसादेवी जयदेव सिंह रावल त्यांच्या भगिनी तसेच सर्वच्या सर्व रावल कुटुंबाला दिनांक २२/०८/२०१५ रोजी अटक करण्याची तयारी पूर्ण झाली होती. असे असताना, रावल बँकेच्या ९८ कोटीच्या

भ्रष्टाचारात सहभागी असलेले, कल्याण मदनलाल अग्रवाल, पारसमल खेतमाल जैन, भावसार ईश्वरलाल बाबुलाल, चंपालाल भवरलाल, डॉक्टर मुकुंद सोहनी, सौ. प्रतिभा भूपेंद्र देसाई यांनी दिनांक २१-२२ ऑगस्ट या दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रत्यक्ष आरोपी जयकुमार रावल (आरोपी क्रमांक तीन) यांच्या नेतृत्वाखाली भेट घेतली. त्यांनी दिलेल्या लेखी निवेदनात ''राजकिय प्रतिस्पर्धी पराभूत उमेदवार डॉ. हेमंत देशमुख (राष्ट्रवादी कॉंग्रेस) व शाम सनेर (कॉंग्रेस) यांनी यांचेविरूध्द खोटे नाटे तक्रारी करून त्या काळात सरकारमधील आपले वजन वापरून बँकेला अडचणीत आणले, परवाना रद्द करण्यास भाग पाडले. एवढ्यावरच न थांबता तक्रारीचा ससेमिरा लावत ठेवून पाठपुरावा करून हेमंत देशमुख यांनी राष्ट्रवादीच्या कार्यकत्यामार्फत तक्रार करून राष्ट्रवादीच्या तत्कालीन गृहमंत्री मार्फत एक चौकशी पथक लावून दिले. (सदर चौकशी पथक श्री. देवेंद्र भारती यांच्या आदेशावरुन नेमण्यात आले होते.) त्या पथकामध्ये आपल्या मर्जीतील अधिकारी व लेखापरीक्षकाची नेमणूक करून लेखा परीक्षक हे कॉंग्रेसचे जेष्ठ नेते दर्याविगीर महंत यांचे पुतणे आहेत. तक्रारधारक हा आज डॉ. हेमंत देशमुख यांचा खाजगी सचिव आहे. या बाबतीत सोबत पुरावे जोडले आहेत. चौकशी अधिकारी दोंडाईचा पोलिस स्टेशनमधील आहेत ज्या पोलिस स्टेशनमधील अधिकारी नेमण्यात आले त्या दोंडाईचा नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदी राष्ट्रवादीचे माजी मंत्री डॉ. हेमंत देशमुख यांची मुलगी ही नगराध्यक्ष पदावर असल्याने या अधिकाऱ्यांवर त्यांचा दबदबा आहे.'' (विनोदच आहे, सलग तीन वेळा आमदार व मंत्री असलेल्या जयकुमार रावलांपेक्षा जास्त देशमुख कुटूंबाचा दबदबा आहे) मुख्यमंत्रीही मान्य करतात. रेवडीवाल्याला गंडेरीवाल्याची साक्ष)

सदर चौकशी एसआयटीने (विशेष चौकशी पथक) केलेल्या तपासावर आमचा विश्वास नाही. त्या ऐवजी सीआयडी अथवा जिल्हा बाह्य अधिकारी यांच्याकडून तपास करावा, अशी मागणी केली.

सदर प्रत्यक्ष आरोपींनी गृहमंत्र्यांसमोर उपस्थित राहून त्यांना पोलीसांच्या ताब्यात न देता, केलेल्या अर्जातील मागणीवर राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी लेखी म्हटले आहे की, **एसीएस होम (तत्कालीन) सीआयडी कडे केस ट्रान्सफर करावी असे स्वच्छ आदेश दिले. मुख्यमंत्री कार्यालयाने (गृहविभाग) (पोल १२) तात्काळ आजच नस्ती सादर करावी. सीआयडी कडे वर्ग करावी. तदनंतर Please issue order immediately then put up to honorable CM for personal** दिनांक २४/०८/२०१५ **असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. आरोपींच्या अर्जावर मुख्यमंत्र्यांनी असे आदेश देणे कितपत संयुक्तीक आहे हे आता माननीय न्यायालयच ठरवेल.**

''आले देवाजीच्या मना तेथे कोणाचे चालेना'' वस्तुस्थिती मात्र यापेक्षा खूपच वेगळी आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक, कायदा व सुव्यवस्था श्री. देवेन भारती यांनी लिहिलेल्या लेखी पत्रात म्हटले आहे की **''पोलीस अधीक्षक धुळे यांनी दोडाईचा पो स्टे गु र नं ५/२०१० या गुन्ह्याचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग करण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये या कार्यालयास विनंती केली आहे. त्यास अनुसरून कळिवण्यात येते की, तपास करण्यास धुळे जिल्हा पोलीस दलाअंर्तगत विशेष कृती दलाची स्थापना करावी, आणि सविस्तर तपास करावा. सदर गुन्ह्यांचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकड़े वर्ग होणेबाबतची विनंती अमान्य करण्यात येत आहे.''** ही वस्तुस्थिती असताना, मुख्यमंत्र्यांना

घटनेतील असलेल्या विशेष अधिकाराचा सर्रास दुरुपयोग करून, एका भ्रष्ट मंत्र्याला व त्यांच्या टोळीला राजकीय संरक्षण देण्याचे महान पुण्यकार्य काम केले. मुख्यमंत्र्यांचे सदर आशीर्वाद शेवटी फळाला आले. सद्या केलेल्या सहा आरोपींपैकी पाच आरोपींवरील आरोप सीआयडीने दाखल केलेल्या शेवटच्या आरोप पत्रात काढून टाकण्यात आले आहेत. माननीय मुख्यमंत्री यांच्या भाषेत त्यांना क्लीन चीट देण्यात आली आहे. यापैकी खालील आठ आरोपींविरुद्ध

| | | |
|---|---|---|
| १) | प्रेम सिंह बल्लेसिंह पाटील | कर्जदार |
| २) | शेखर रामसिंग परदेशी | कर्जदार |
| ३) | निखिल पृथ्वीराज परदेशी | कर्जदार |
| ४) | कोमल पोलाद सिंग गिरासे | कर्जदार |
| ५) | जयदेव सिंह जयसिंह रावल | चेअरमन कर्ज समिती सदस्य<br>बापूसाहेब (सख्खे काका) |
| ६) | शबीर भाई मोहम्मद कादियानी | व्हाईस चेअरमन कर्ज संमिती |
| ७) | कल्याण मदनलाल अग्रवाल | संचालक कर्ज समिती सदस्य |
| ८) | इंद्रिमा देवेंद्र सिंह राजपूत | कर्जदार (आत्याची सून) |

भादवि ४०६, ४०९, ४२०, ४७७, २०१, ३४ व १२० (ब) महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंबंधी संरक्षण कायदा १९९९ चे कलम ३९ अन्वये पुरवणी दोषारोप पत्र व नऊ कर्जदार आरोपी मोहनलाल नरसुलाल पटवारी मयत झाल्याने त्यांचे विरुद्ध समरी अहवाल सादर केला आहे. उपरोक्त आरोपींविरुद्ध एस.आय.टी., सी.आय.डीचे चार चौकशी अहवाल व फॉरेन्सीक ऑडीटरच्या ४४ पानांचा ताजा अहवाल मा. न्यायालयाने गांभिर्याने घेतल्यास, किमान सात वर्षापासून जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद असलेली कलमे लावली आहे. सीआयडीने माननीय न्यायालयात दाखल केलेल्या अंतिम आरोप पत्रात खालील ११ सदस्यांना वगळण्यात आले आहे.

१) सौ. विजयादेवी प्रेमसिंह राजपूत
२) रणवीरसिंह विजयसिंह रावळ
३) चेतनसिंह नवलसिंह राजपूत
४) जितेंद्रसिंह जयसिंह रावल (वडील)
५) हंसारानी जितेंद्रसिंह रावल (आई)
६) रितेश नेमीचंद जैन
७) विक्रांत जयदेवसिंह रावल (चुलत भाऊ)
८) विजय कृष्णराव गावीत (माजी मंत्री)
९) प्रितेश चंपालाल जैन
१०) चंपालाल भेरुलाल जैन

परतफेडीत वरील आरोपींची जबाबदारी टाळीत असल्याचे दिसत नाही. त्यांची नावे फिर्यादीने गैरसमजुतीने टाकली. असे मत सी.आय.डी.ने व्यक्त केले आहे.

११) मयत दिलीपसिंह रजेसिंह गिरासे, बँक मॅनेजर, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ त्यांनी परत कर्ज फेडीत जबाबदारी टाळण्याची आढळून येत नाही.

फिर्यादीने म्हणजे एसआयटीचे अधिकारी श्री. शिरसाठ यांनी दिनांक १५/०६/२०१५ रोजी पूर्ण चौकशीअंती सादर केलेला अहवाल, हा गैरसमजातून केला

असल्याचे सीआयडीने कळविले. निष्कर्ष कशाच्या आधारावर काढले? हे खरोखरच अनाकलनिय आहे. आश्चर्य असे की ज्या सीआयडीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सदर तपास सीआयडी करू शकत नाही असे कळवले होते. **आरोपींच्या मागणीवरून मुख्यमंत्र्यांनी त्या सीआयडीच्या अधिकाऱ्यांना तपास करण्याची बळजबरी केली हे तितकेच सत्य आहे.** फडणवीसांच्या मुख्य व गृहमंत्री पदाच्या कारकिर्दीत आता आरोपींच ठरवणार की चौकशी कोण करणार? रावल बँकेचे प्रकरण दिनांक २९/०७/२००६ म्हणजे जयकुमार रावल हे आमदार पदी निवडून आल्यापासून आरबीआयच्या रडारावर होते. आरबीआयने दिनांक २९/०७/२००६ रोजी काढलेल्या आदेशात, बँकेला कुठलाही व्यवहार करता येणार नाही. तसेच अनेक व्यवहार संशयास्पद आहेत. असे स्पष्टपणे नमूद केले होते. तर नंतर दिनांक २८/०४/२०१० रोजी रजिस्टार सहकारी सोसायटी यांनी रावल बँकेचे संचालक मंडळ बरखास्त केले. सदर कालावधीत जयकुमार रावल हे दुसऱ्यांदा आमदार झाले होते. **दिनांक ०३/०१/२०११ रोजी आरबीआय ने सदर बँकेचा परवाना रद्द केला.** बँकेचे सभासद श्री. शरद माधवराव पाटील यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या माननीय औरंगाबाद खंडपीठाकडून १५६ (३) प्रमाणे आदेश आणून गु.र.नं. ०५/२०१० दोंडाईचा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला. जयकुमार रावल गेली वीस वर्षे आपली अटक टाळत आहेत आणि **दुर्दैवाने राज्याचे मुख्यमंत्री त्यांना पाठीशी घालीत आहेत. वर घोषणाही करीत आहेत की, भ्रष्टाचाऱ्यांची मी गय करणार नाही. म्हणजे त्याला मंत्रिमंडळात घेतल्याशिवाय राहणार नाही, असा त्यांचा अर्थ आहे.**

आजमीतिस सीआयडीने केलेल्या फॉरेन्सीक ऑडीटचा ४४ पानांचा अहवाल माननीय न्यायालयात दाखल झाला आहे. सदरचा अहवाल हा दिनांक १४/०२/२०२२ रोजी सीआयडी कार्यालयात पोहोचला होता. ३ वर्ष ४ महिने सीआयडी ने हा अहवाल माननीय न्यायालयापासून लपवून ठेवला. सदर अहवालात अनेक गंभीर घटना समोर आल्या आहेत. फॉरेन्सिक ऑडिट करणाऱ्या संस्थेला, जनरल मीटिंग व आरबीआयची कागदपत्रे शेवटपर्यंत मिळाली नाहीत. एवढेच नव्हे तर, अत्यंत बोगस व बनावट कागदपत्रे सादर करून, सदर अहवाल माननीय न्यायालयासमोर आणला आहे. मी गेल्या १० वर्षापासून रावल बँकेच्या भ्रष्टाचाराविरूद्ध लढत आहे. वेळ पडल्यास रावल बँकेच्या भ्रष्टाचाराविरूद्ध आपण सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावल्याशिवाय राहणार नाही. असा संकल्प शिवसेना नेते माजी आमदार कार्यसम्राट अनिल अण्णा गोटे यांनी केला आहे.

**आपला**



**अनिल गोटे**

**माजी आमदार**